सकाळ कोल्हापूर
बुधवार, २२ नोव्हेंबर २०२३
TODAY



गडहिंग्लज : आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत यश मिळविलेल्या ओंकार महाविद्यालयाच्या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी राजन पेडणेकर, गजानन गिजवणेकर, डॉ. अनिल पाटील, सुरेश धुरे उपस्थित होते.

## ओंकार महाविद्यालयाच्या खेळाडूंचे यश

गडहिंग्लज : येथील ओंकार महाविद्यालयाच्या खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धेत यश मिळविले. प्रतीक पाटील याने २०० आणि ४०० मीटर धावणे प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. त्याला स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूचा बहुमान मिळाला. ४x४०० मीटर रिलेमध्ये मुलांच्या संघाने रौप्यपदक मिळविले. या संघात प्रतीक पाटील, दीपक घोलराखे, रुपेश घोलराखे, ओंकार पोवार यांचा समावेश होता. संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, संचालक गजानन गिजवणेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, शारीरिक शिक्षण संचालक सुरेश धुरे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.